महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गोंदिया वनविभाग गोंदिया

# उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग गोंदिया यांचे कार्यालय

वनभवन, कुडवानाका रोड, गोंदिया फोन नंबर (०७१८२) २३५३८८ , फॅक्स २३७२६५ email:dycfgondia@mahaforest.gov.in

जा.क्र.कक्ष-६ विक्री –जंकास/प्रक्र.३५/२६-२७/ 1287 दि. 30/7/026

प्रति,
इमारती/जळाऊ/बांबु,
वनोपज खरेदीदार (सर्व)ई-लिलाव

विषय:- वनोपज खरेदीदार यांनी EMD रक्कम भरणा करणेबाबत.

संदर्भ:- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांचे पत्र क्रमांककक्ष-16/ए-2/प्रक्र-34/भाग-3/2023-24/29८ दिनांक 13 जून 2024

शासन निर्णय, महसूल वन विभाग क्रमांक एमएफपी-2012/प्रक्र-01/फ-9 दिनांक 15/01/2020 मध्ये 3 (अ) नुसार ईच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी त्यांची ज्या रकमेपर्यंतची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रकमेच्या 10 टक्के रक्कम इसा-याची रक्कम म्हणून लिलावाच्या सुरुवातीला जमा केल्याखेरीज त्या बोलीदाराला बोली बोलण्याची परवानगी देण्यात येणार नाही असे नमूद आहे.

परंतू या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश खरेदीदार लिलावाच्या सुरुवातीला अनामत रक्कम न भरता ई-लिलावात सहभागी होतात. करीता शासन निर्णय दिनांक 15/01/2020 मध्ये 3(अ) नुसार ईच्छुक बोलीदारांनी बोली बोलण्यापूर्वी त्यांची ज्या रकमेपर्यंतची बोली बोलण्याची इच्छा असेल त्या रकमेच्या 10 टक्के रक्कम इसा-याची रक्कम म्हणून लिलावाच्या सुरुवातीला जमा केल्यानंतरच ई-लिलावात सहभाग घेण्यांत यावा. याबाबत सर्व ई-लिलाव खरेदीदारांनी नोंद घ्यावी.

(पवनकुमार आ. जोंग)
उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया

प्रतिलिपी:- मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस सविनय सादर. मार्फत वनसंरक्षक प्रा.नागपुर

प्रतिलिपी:- वरिष्ठ तांत्रिक संचालक, एनआयसी, नागपूर यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी सदर पत्र ई-लिलावाच्या पोर्टलमध्ये News मध्ये सतत Publish होण्याच्याबाबत कार्यवाही करुन तसा पुर्तता अहवाल सादर करावा. तसेच, ईएमडी भरल्या शिवाय खरेदिदारांना ई-लिलावात सहभाग नोदवता येऊ नये या करिता ई ऑक्शन पोर्टल वर तशा सुधारणा कराव्यात.

प्रतिलिपी:- श्री. योगेश काळे, एनआयसी प्रतिनिधी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस रवाना. त्यांनी सदर पत्र ई-लिलावाच्या पोर्टलमध्ये News मध्ये सतत Publish होण्याबाबत कार्यवाही करुन तसा पुर्तता अहवाल सादर करावा.

प्रतिलिपी :- सुचना फलक, विभागीय कायारलय / आगार- नवेगाव बांध /आगार-डोंगरगांव

F://Vaishali/covering letter 25.26